दै. पुण्यनगरी दि. 28

## संक्षिप्त



**नरसी : उत्कृष्ट तपासाबद्दल पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सहायक पोलिस निरीक्षक विक्रम हराळे यांचा सन्मान केला.**

## सपोनि हराळे यांचा सन्मान

**नरसी :** नादेंडचे पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते रामतीर्थ पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक विक्रम हराळे यांनी जूनमध्ये ९२ गुन्ह्यांचा तपास केल्यामुळे त्यांना नुकतेच पोलिस अधीक्षक कार्यालयात प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. रामतीर्थ ठाण्याच्या हद्दीत चोरीच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली होती. त्यामुळे परिसरात दहशत निर्माण झाली होती, परंतु रामतीर्थ ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक विक्रम हराळे यांनी दोन महिन्यांपूर्वी पदभार स्वीकारल्यानंतर मागील अनेक महिन्यांपासून हद्दीत झालेल्या चोऱ्यांचा तपास लागत नव्हता मात्र हराळे यांनी दोनच महिन्यांत ९२ गुन्ह्यांचा तपास मुदतीत पूर्ण केला. रामतीर्थ ठाण्याच्या हद्दीत असलेल्या कोल्हे बोरगाव येथे एकाच दिवशी चार घरफोड्या करून चोर पळून जाण्यात यशस्वी झाले होते. मात्र हराळे यांनी या घटनेतील मुख्य सूत्रधार असणारे आरोपी पकडून मुद्देमाल जप्त केला. त्यांच्या या कार्यामुळे सामान्य जनतेत नवचैतन्य पसरले आहे.

दै. पुढारी.

# अवैध वाळू वाहतूक; २५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नायगाव, पुढारी वृत्तसेवा :** रामतीर्थ पोलिसांनी अवैध वाळू तस्करीवर धडाकेबाज कारवाई केली आहे. केरूर शिवारात शनिवारी (दि. २३ ऑगस्ट) संध्याकाळी ५ वाजता हायवा टिप्पर पकडून तब्बल २५ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सहायक पोलिस निरीक्षक विक्रम हराळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथक गस्त घालत असताना केरूर शिवारात सुसाट वेगाने जाणारा हायवा संशयीत वाटला. अडवून तपासणी केली असता हायवा क्रमांक एम एच २६ सी एच ९६१२ मध्ये सात ब्रास वाळू आढळली. एकूण मुद्देमाल तब्बल २५ लाख ३५ हजार रुप किंमतीचा असल्याचे पोलिसां सांगितले. या प्रकरणी टिप्पर चालक साईनाथ बाबाराव मोरे (वय ३०, रा. टाकळी, ता. नायगाव, जि. नांदेड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास रामतीर्थ पोलिस ठाण्याचे पथक करत आहे.

नायगाव परिसरासह जिल्ह्यात वाळूची अवैध वाहतूक दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे शासनाला महसुलात मोठा तोटा सहन करावा लागत असून नदीपात्रांचे नुकसान होऊन पर्यावरणीय समतोल धोक्यात आला आहे. पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी हराळे व त्यांच्या पथकाचे कौतुक केले आहे.